जिल्हा निवड समिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, वर्धा
जनता चौक, रामनगर, वर्धा
दुरध्वनी क्रमाक :- (०७१५२) २५०७७३
e-mail :- powardhap@yahoo.com

## "कंत्राटी कला (कार्यानुभव) शिक्षक", "कंत्राटी संगणक शिक्षक / मार्गदर्शकांची " (११ महिन्याच्या कराराने) भरावयाच्या पदभरतीची जाहिरात(दुसरी वेळ)

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र शाआशा-२०१९/प्र.क्र.१२५/का.१३, दिनांक १३ जून, २०१९ व दिनांक १५/१२/२०१८ अन्वये आदिवासी विकास विभागाअंतर्गत असलेल्या आश्रमशाळेमध्ये "कंत्राटी कला (कार्यानुभव) शिक्षक", "कंत्राटी संगणक शिक्षक /निर्देशक मार्गदर्शकांची " पदे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता आहे. त्याअनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, वर्धा अंतर्गत वर्धा जिल्हयातील शासकीय आश्रमशाळेसाठी "कंत्राटी कला (कार्यानुभव) शिक्षक", "कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक" या पदाकरीता अर्हताधारक पात्र उमेदवारांकडून विहित नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज भरण्याची मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून अंतिम दिनांक १५/०१/२०२० पर्यंत राहील.

पदांची संख्या खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदांचे नाव | आवश्यक पद संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटी कला (कार्यानुभव) शिक्षक | ०२ पदे (आकृतीबंधाबाहेरील) | |
| २ | कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक | ०२ पदे (आकृतीबंधाबाहेरील) | |

### शैक्षणिक अर्हता / अनुभव

(अर्ज करतेवेळी उमेदवाराने खालीलप्रमाणे अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. | पदाचे नांव व एकत्रित मानधन | आवश्यक शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|
| १. | **कंत्राटी कला (कार्यानुभव) शिक्षक** ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीवर दरमहा एकत्रित मानधन रु. २०,०००/- (वीस हजार रुपये फक्त) | ए.टी.डी. (Art Teacher Diploma आर्ट टिचर डिप्लोमा) | उच्च शिक्षित ए.एम./ बी.एफ.ए. व नृत्य /गायन / वादन विषयातील पदवी अर्हता प्राप्त उमेदवारांना प्राधान्य राहील. |
| २. | **कंत्राटी संगणक शिक्षक / निर्देशक** ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीवर दरमहा एकत्रित मानधन रु. २०,०००/- (वीस हजार रुपये फक्त) | B.SC (CS/IT) किंवा B.C.A. किंवा B.E. (Computer) किंवा B.Tech. (Computer) व तत्सम पदवी ही किमान शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. | उच्च शिक्षित M.C.A /M.Sc. in Computer / IT व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य राहील. |

**वयोमर्यादा-** किमान वय १८ व कमाल ४३ वर्ष असावे.

अर्ज करण्याची पध्दत, अर्जाचा नमूना, अटी व शर्ती तसेच इतर सविस्तर माहिती **मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचे** www.atcnagpur.com **या वेबसाईटवर** उपलब्ध आहे. तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, वर्धा येथील सूचना फलकावर माहिती उपलब्ध आहे.

स्वा/-
**(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.वर्धा तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
वर्धा

स्वा/-
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
वर्धा

Scanned by CamScanner

## अर्जाचा नमूना

(A४ साईज कागदावर)

प्रति,

प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
जनता चौक,रामनगर,
वर्धा

विषय :- ---------------------------------------या पदाकरिता अर्ज

१) **उमेदवाराचे संपूर्ण नाव** :------------------------------------------------

२) **जन्म तारीख** :- वर्ष -------, महिना ------ दिवस-------

अक्षरी ------------------------------------

०६ /०१/२०२० रोजी :- वय :- -------- वर्ष-------महिने-------..दिवस

३) **पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता** :- -------------------------------------------------

-------------------------------------------------

-------------------------------------------------

मोबाईल क्र.-.-----------------------------------

ई-मेल- -------------------------------------------

४) **अर्जदाराचा मुळ अधिवास** :- ----------------------------------------------------------
(जिल्हा अधिवास प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले असावे.)

५) **शैक्षणिक अर्हता :-**

| धारण केलेले शैक्षणिक अर्हतेचा तपशील | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

६) **तांत्रिक अर्हता**

| धारण केलेले शैक्षणिक अर्हतेचा तपशील | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

७) **अनुभव**

| अ क्र | काम केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महीने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयाकरिता ---------------पदाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी :- -------------------

उमेदवाराचे पुर्ण नाव :- -----------------------------

Scanned by CamScanner

## "कंत्राटी कला (कार्यानुभव) शिक्षक" अर्ज करण्याची व उमेदवार निवडीची कार्यपध्दती/अटी व शर्ती

१. आकृतीबंधाबाहेरील पदाकरीता जाहिरातीमध्ये दर्शविल्यानुसार या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्येच अर्ज करावा. अन्य नमुन्यात अर्ज स्विकारल्या जाणार नाही. वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून१० दिवसाच्या आंत **दिनांक १५/०१/२०२०** पर्यंत अर्ज करणे बंधनकारक राहिल.

२. एका उमेदवाराला एका पदाकरीता एकच अर्ज करता येईल. अर्ज स्वहस्ते, टपालाने विहीत मुदतीतच कार्यालयीन वेळ सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:४५ च्या दरम्यान स्वीकारल्या जातील. कोणत्याही कारणाने व दिरंगाईमुळे मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. अर्ज करणे, तांत्रीक चाचणी, व्यक्तीगत मुलाखतीसाठी येण्या जाण्याच्या खर्चाची जबाबदारी उमेदवाराची स्वत:ची राहील. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा खर्च दिला जाणार नाही.

४. जाहीरातीत दिलेल्या पदाची संख्या भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर कमी अथवा जास्त होवु शकते.

५. वरील पदाकरीता प्राप्त अर्ज जास्त संख्येने असल्यास गुणवत्ता व इतर बाबी लक्षात घेवून प्राप्त अर्जाची शैक्षणिक गुणवत्तेवर चाळणी करुन शॉर्ट लिस्ट (short list) करण्यात येईल, त्याची तांत्रीक कार्यक्षमता तपासुन आणि वैयक्तीक मुलाखत घेवुन सर्वकष बाबींचा विचार करुन गठित निवड समिती व्दारा योग्य उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीचे संपुर्ण अधिकार निवड समितीला असतील.

६. वरील पदाचे शैक्षणिक पात्रता व गुणवत्तेनुसार एका पदास ३ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच तांत्रीक योग्यता तपासणीसाठी व त्यानुसार वैयक्तीक मुलाखतीकरीता बोलविण्यात येईल.

७. अर्जदार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा. याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

८. अर्जदारास मराठी व इंग्रजीचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच संगणकावर इंग्रजी व मराठी भाषेत कामकाज करण्याची तांत्रिक योग्यता असणे अनिवार्य आहे.

९. वरील पदासाठी अर्जदाराने अर्ज केला आहे त्या उमेदवाराचा अर्ज चाळणी प्रक्रियेत योग्य ठरल्यास या कार्यालयाने कळविल्यानंतर अर्जामध्ये नमुद शैक्षणिक, तांत्रिक, अनुभव ईत्यादी पात्रता धारण करीत असल्याचे शैक्षणिक कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१०. आकृतीबंधाबाहेरील पदावर निवड झालेल्या उमेदवाराचे हे पद नियमित स्वरूपाचे नसल्याने त्यावर त्यांना कोणताही कायमस्वरुपी हक्क सांगता येणार नाही तसेच न्यायालयात दाद मागता येणार नाही.

११. सदर पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.

१२. या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

१३. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी गठित करण्यात आलेल्या सदर निवड समितीमार्फत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१४. सदर नेमणूक ही करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठीच किंवा शैक्षणिक सत्र संपेपर्यंत राहील.

१५. आदेशातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/-चे स्टॅमपेपरवर करारनामा लिहुन दयावे लागेल.

१६. निवड केलेल्या उमेदवारांना मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कडुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर तात्पुरत्या नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

१७. कला (कार्यानुभव) शिक्षकाची नियुक्ती करतांना हे पद नियमित करण्याची अथवा अन्य मंजूर पदांमध्ये समायोजन करण्याची कोणतीही मागणी / विनंती मान्य राहणार नाही तसेच केव्हाही कारण न दाखवता संबधित कला (कार्यानुभव) शिक्षकाला सेवेतून कमी करण्यात येईल.

१८. कला (कार्यानुभव) शिक्षकाची आश्रमशाळेच्या शालेय वेळात प्रामुख्याने इ. १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना कला (कार्यानुभव) या विषयाचे अध्यापन करण्याची राहील. त्यासोबत शालेय कामकाजात कला (कार्यानुभव) विषयाशी संबधित कार्य करण्याची जबाबदारी राहील.

१९. निवड झालेल्या कला (कार्यानुभव) शिक्षकास शालेय परिसरातच वास्तव्य करावे लागेल.

स्वा/-
**(डॉ.सचिन ओम्बासे, मा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी.जि.प.वर्धा तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
वर्धा

स्वा/-
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
वर्धा

Scanned by CamScanner

# "कंत्राटी संगणक शिक्षक/निर्देशक"अर्ज करण्याची व उमेदवार निवडीची कार्यपध्दती/अटी व शर्ती

१. आकृतीबंधाबाहेरील पदाकरीता जाहिरातीमध्ये दर्शविल्यानुसार या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्येच अर्ज करावा. अन्य नमुन्यात अर्ज स्विकारल्या जाणार नाही. वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आंत **दिनांक १५/०१/२०२० पर्यंत** अर्ज करणे बंधनकारक राहिल.

२. एका उमेदवाराला एका पदाकरीता एकच अर्ज करता येईल. अर्ज स्वहस्ते, टपालाने विहीत मुदतीतच कार्यालयीन वेळ सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:४५ च्या दरम्यान स्वीकारल्या जातील. कोणत्याही कारणाने व दिरंगाईमुळे मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. अर्ज करणे, तांत्रीक चाचणी, व्यक्तीगत मुलाखतीसाठी येण्या जाण्याच्या खर्चाची जबाबदारी उमेदवाराची स्वत:ची राहील. कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा खर्च दिला जाणार नाही.

४. जाहीरातीत दिलेल्या पदाची संख्या भरतीच्या कोणत्याही टप्यावर कमी अथवा जास्त होवु शकते.

५. वरील पदाकरीता प्राप्त अर्ज जास्त संख्येने असल्यास गुणवत्ता व इतर बाबी लक्षात घेवून प्राप्त अर्जाची शैक्षणिक गुणवत्तेवर चाळणी करुन शॉर्ट लिस्ट (short list) करण्यात येईल, त्याची तांत्रीक कार्यक्षमता तपासुन आणि वैयक्तीक मुलाखत घेवुन सर्वकष बाबींचा विचार करुन गठित निवड समिती व्दारा योग्य उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीचे संपुर्ण अधिकार निवड समितीला असतील.

६. वरील पदाचे शैक्षणिक पात्रता व गुणवत्तेनुसार एका पदास ३ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच तांत्रीक योग्यता तपासणीसाठी व त्यानुसार वैयक्तीक मुलाखतीकरीता बोलविण्यात येईल.

७. अर्जदार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा. याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

८. अर्जदारास मराठी व इंग्रजीचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच संगणकावर इंग्रजी व मराठी भाषेत कामकाज करण्याची तांत्रिक योग्यता असणे अनिवार्य आहे.

९. वरील पदासाठी अर्जदाराने अर्ज केला आहे त्या उमेदवाराचा अर्ज चाळणी प्रक्रियेत योग्य ठरल्यास या कार्यालयाने कळविल्यानंतर अर्जामध्ये नमुद शैक्षणिक, तांत्रिक, अनुभव ईत्यादी पात्रता धारण करीत असल्याचे शैक्षणिक कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१०. आकृतीबंधाबाहेरील पदावर निवड झालेल्या उमेदवाराचे हे पद नियमित स्वरूपाचे नसल्याने त्यावर त्यांना कोणताही कायमस्वरुपी हक्क सांगता येणार नाही तसेच न्यायालयात दाद मागता येणार नाही.

११. सदर पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी / बाहयस्त्रोत पध्दतीने असेल.

१२. या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

१३. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी गठित करण्यात आलेल्या सदर निवड समितीमार्फत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

१४. सदर नेमणूक ही करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठीच किंवा शैक्षणिक सत्र संपेपर्यंत राहील.

१५. आदेशातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/- चे स्टॅमपेपरवर करारनामा लिहुन दयावे लागेल.

१६. निवड केलेल्या उमेदवारांना मा. जिल्हाधिकारी, वर्धा नागपूर यांचे कडुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर तात्पुरत्या नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

१७. संगणक शिक्षक / निर्देशकाची नियुक्ती करतांना हे पद नियमित करण्याची अथवा अन्य मंजूर पदांमध्ये समायोजन करण्याची कोणतीही मागणी / विनंती मान्य राहणार नाही तसेच केव्हाही कारण न दाखवता संबधित संगणक शिक्षक / निर्देशकाला सेवेतून कमी करण्यात येईल.

१८. संगणक शिक्षक / निर्देशकाची आश्रमशाळेच्या शालेय वेळात प्रामुख्याने इ. ५ वी ते १२ पर्यतच्या विद्यार्थ्यांना संगणक या विषयाचे अध्यापन करण्याची जबाबदारी राहील. त्यासोबत ई- लर्निंग पध्दतीने विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी विषय शिक्षकांना तांत्रिक मदत करणे.

१९. शालेय कार्यालयीन कामासाठी संगणकाशी संबधित (उदा. माहिती तयार करणे, शालार्थ व सरल, आर्थिक देयके इ.) करण्यासाठी तांत्रिक बाबतीत मदत करणे, संगणक कक्षाच्या वापरावर संनियंत्रण करण्याची जबाबदारी राहील.

२०. निवड झालेल्या संगणक शिक्षक / निर्देशकास शालेय परिसरातच वास्तव्य करावे लागेल.

स्वा/-
(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी.जि.प.वर्धा तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
वर्धा

स्वा/
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
वर्धा

Scanned by CamScanner